


दैनिक

# अक्षराज

अचूक वेध,अचूक बातमी

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

वर्ष : ०४, अंक : ३३७
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.com
Email : newsaksharaj2021@gmail.com

बुलडाणा, शुक्रवार, दि.१८ जुलै २०२५

## शिक्षकांकडून अवैध शिकवणी वर्ग

### प्रा. मिरजगावे आणि प्रा. सूर्यवंशी यांच्यावर कारवाईची मागणी

**अक्षराज : रमेश पंडित**

**दि.१७, हिमायतनगर :** हिमायतनगर तालुक्यातील राजा भगीरथ महाविद्यालयातील प्रा. मिरजगावे व प्रा. सूर्यवंशी हे शिक्षक सर्रासपणे शासनाच्या नियमांना धाब्यावर बसवून कोचिंग क्लासेस थाटून, अवैध शिकवणी वर्ग घेत असल्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे.

संबंधित शिक्षक विद्यार्थ्यांना प्रॅक्टिकलच्या गुणाचा धाक दाखवत तसेच इतर प्रलोभने देऊन शिकवणीसाठी बोलावत आहेत, असा आरोप C.C.T.F.M. संघटनेने निवेदनाच्या माध्यमातून केला आहे.

या संदर्भात C.C.T.F.M. या संघटनेने निवेदनाच्या माध्यमातून गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती, हिमायतनगर यांच्याकडे लेखी तक्रार केली असून शिक्षण विभागाच्या संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांनाही प्रतिलिपी देण्यात आली आहे.

या प्रकरणी महाराष्ट्र खाजगी शाळा कर्मचारी (सेवा शर्ती) विनियमन अधिनियम, १९७७ चे कलम ४(५) तसेच आरटीई कायदा २००९ चे कलम २८ यांची सरळसरळ पायमल्ली होत असल्याचे नमूद करण्यात आले आहे.

तरी संबंधित शिक्षकांवर त्वरित व योग्य ती कारवाई करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

## सुभाष शिल्लेवाड यांची गोल्ला गोल्लेवार संघटना

### जिल्हा कार्याध्यक्ष पदी निवड



**अक्षराज : लक्ष्मण शेनेवाड**

**दि.१७, हिमायतनगर :** सिरंजणी येथील मा. सरपंच तथा गोल्ला गोल्लेवार समाजातील सर्वांच्या मदतीला धावून जाणारे धर्मनिरपेक्ष समाज सेवक तथा राजकारणी सुभाष शिल्लेवाड यांच कर्तुत्व पाहुन समाजांचे प्रांत अध्यक्ष भुमन्ना अक्कमवाड ह्यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व समाज बांधवांच्या माध्यमातून त्यांची जिल्हा कार्याध्यक्ष पदी निवड करण्यात आली.

याबाबत सविस्तर वृत्त असे कि, समाजातील कर्तव्यदक्ष व्यक्ती जिल्हा पुरवठा अधिकारी बारदेवाड आणि उ. बा. ठा गटाचे नवनिर्वाचित तालुका अध्यक्ष संजय काईतवाड यांचा सत्कार करण्याचे अवचित्त सांधुन समाजाचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष भुमन्ना अक्कमवाड ह्यांनी समाजातील निष्ठावंत सुभाष शिल्लेवाड यांची त्यांची समाजाविषयी तळमळता लक्षात घेऊन त्यांना जिल्हा कार्याध्यक्ष पदी त्यांची निवड करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी उपस्थित जिल्हा पुरवठा अधिकारी बारदेवाड, किनवट पंचायत समिती सदस्य कपिल करेवाड, नवनिर्वाचित तालुका अध्यक्ष संजय काईतवाड, बाबाराव जरगेवाड, प्रकाश भदेवाड, श्याम जक्कलवाड, गंगाधर बासेवाड, यासह सर्व समाज बांधवांनी त्यांचे स्वागत करुन पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## ठाणे जिल्ह्यातील हातभट्टीवर धाडसत्र ! ९.१६ लाखाचा मुद्देमाल जप्त...



**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.१७, ठाणे :** जिल्ह्यातील अंजूरगाव व आलीमघर खाडीमध्ये अवैध हातभट्टी केंद्र नष्ट करण्यासाठी हातभट्टी केंद्रावर धाडसत्र राबवून धडक कारवाई करण्यात आली. पावसाचा फायदा घेत या खाडीत अवैध हातभट्टी मद्य निर्मितीत वाढ झाली होती. त्याअनुषंगाने उत्पादन शुल्कच्या प्रशिक्षित जवानांनी बोटीने जावून सर्व हातभट्टी मद्य निर्मिती ठिकाणे १५ जुलै रोजी नष्ट केली. या कारवाईत एकूण ९ लाख १६ हजार १०० रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. तसेच महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम कायदा १९४९ अंतर्गत ०३ गुन्हे नोंद करण्यात आले.

ठाणे जिल्ह्यामध्ये सामूहिक मोहिम राबवून केलेल्या कारवाईत २०० लिटर क्षमतेचे १७८ ड्रम व १००० ली. क्षमतेचे ३ बॉयलर त्यामध्ये ३३ हजार ६०० लीटर रसायन व ३५ ली. गावठी दारु, इतर हातभट्टी साहित्य जप्त करण्यात आले. यावेळी काही मुद्देमाल नाशवंत असल्याने तो जागीच नष्ट करण्यात आला.

राज्य उत्पादन शुल्कचे आयुक्त डॉ राजेंद्र देशमुख, सहआयुक्त प्रसाद सुर्वे यांच्या मार्गदर्शनाखाली कोकण विभागाचे विभागीय उपआयुक्त प्रदीप पवार यांच्या आदेशान्वये ही कारवाई करण्यात आली. या कारवाईमध्ये उप अधीक्षक वैभव वैद्य, दुय्यम निरीक्षक एच. एम. देवकाते, सहा. दुय्यम निरीक्षक रणजीत आडे, तसेच जवान संदिप धुमाळ, अविनाश जाधव, रामचंद्र पाटील, राजु राठोड, भाऊसाहेब कराड, नारायण जानकर, विनोद अहिरे, प्रविण धवणे, रुपेश खेमनार यांचा सहभाग होता.

हातभट्टी दारु, अवैध मद्य निर्मिती केंद्रांवर राज्य उत्पादन शुल्क, कोकण विभाग, ठाणे विभागाची धाडसत्र मोहिम राबविण्यात येत आहे. नागरिकांना अशा अवैध धंद्यांबाबत तक्रार करायची असल्यास त्यांनी टोल फ्री क्रमांक १८००२३३९९९९ वर संपर्क साधू शकतात, असे आवाहनही राज्य उत्पादन शुल्क विभागाने केले आहे.

## हिवाळी अधिवेशनावर निवडणुकीचे सावट, घोषणांवर येणार मर्यादा

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१७, नागपूर :** उपराजधानीत येत्या आठ डिसेंबरपासून सुरू होणाऱ्या राज्य विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनावर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचे सावट राहणार आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार स्थानिक संस्थांच्या निवडणुका झाल्यास राज्याच्या बहुतांश भागात आदर्श आचारसंहिता लागू राहू शकते. त्यामुळे सरकारकडून कोणत्या घोषणा होऊ शकतात, याचा अंदाज आतापासूनच घेतला जात आहे.

महापालिका व जिल्हा परिषदांसह अन्य स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका डिसेंबर अखेरीस किंवा नवीन वर्षात होण्याची शक्यता आहे. प्रभाग रचनेचा सुधारित कार्यक्रम जाहीर झाल्यानंतर ऑक्टोबरच्या पहिल्या आठवड्यात अंतिम प्रारूप यादी प्रसिद्ध होईल.

प्रभाग रचनेनंतर आरक्षणाची प्रक्रिया राबवण्यासाठी साधारणतः एक महिन्याचा कालावधी लागतो. यावर सूचना आणि हरकती मागवण्यात



येतील. यासोबतच मतदार याद्यांचे प्रभागनिहाय विभाजन केले जाते. ही प्रक्रिया देखील एक ते दीड महिना चालेल. साधारणतः नोव्हेंबरच्या दुसऱ्या-तिसऱ्या आठवड्यात निवडणुकीची घोषणा होऊ शकते, असा जाणकारांचा अंदाज आहे. राज्य निवडणूक आयोगाला ईव्हीएम आणि निवडणूक निर्णय अधिकारी, सहायक अधिकाऱ्यांसह इतर मनुष्यबळ व सुरक्षा यंत्रणा कशी उपलब्ध होते, त्यानुसार निवडणुकीचे टप्पे ठरतील. निवडणुकीची घोषणा झाल्यापासून ४५ दिवसांत मतदान व मतमोजणी करण्यात येते. नोव्हेंबरमध्ये घोषणा झाल्यास आचारसंहिता लागू होईल. त्याचप्रमाणे नेतेमंडळी देखील व्यूहरचना आणि प्रचारात व्यस्त राहतील. आचारसंहितेमुळे सरकारला पॅकेज किंवा मतदारांना आकर्षित करणाऱ्या घोषणा करता येणार नाहीत, अशी चर्चा राजकीय वर्तुळात सुरू झाली आहे.

दरम्यान, राज्यातील ६८७ स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका तीन टप्प्यांत घेण्याचे नियोजित असल्याची माहिती आहे. पहिल्या टप्प्यात ऑक्टोबरमध्ये पंचायत समिती, नगर परिषदा आणि नगरपंचायतींच्या निवडणुका घेण्याची चाचपणी सुरू आहे. तर नोव्हेंबरमध्ये जिल्हा परिषदांच्या, तर सर्वांत शेवटी डिसेंबरमध्ये महापालिकांच्या निवडणुका होण्याची शक्यता आहे. इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रांची (ईव्हीएम) मर्यादित संख्या डोळ्यासमोर ठेवून राज्य निवडणूक आयोगाने एकाच वेळी या निवडणुका घेण्यास असमर्थता दर्शविल्याची माहिती आहे. तर निवडणुका तीन टप्प्यांत घेण्याचे नियोजन असल्याचा दावा सूत्रांनी केला आहे.

## पुणेकरांच्या प्रवासाला आणखी गती मिळणार, चार नव्या वंदे भारत सुरु होणार



**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१७, पुणे :** कर्नाटक, तेलंगणा, गुजरात आणि विदर्भात जाणाऱ्या पुणेकरांसाठी आनंदाची बातमी आहे. पुणेकरांचा प्रवास गारेगार आणि सुकर होणार आहे. पुणे स्टेशनवरुन लवकरच चार नव्या वंदे भारत सुरु होणार असल्याची माहिती आहे. सध्या दोन वंदे भारत पुण्याहून कोल्हापूर आणि हुबळीसाठी धावत आहेत. यात आता आणखी ४ ट्रेनची भर पडत असल्याने पुणेकरांची प्रवासाची चिंता मिटणार आहे. यामुळे पुणे जंक्शन एकूण सहा वंदे भारत एक्सप्रेस गाड्यांचे केंद्र बनू शकणार आहे. पुणे-शेगाव, पुणे-बेळगाव, पुणे-बडोदा आणि पुणे-सिकंदराबाद या नव्या वंदे भारत एक्स्प्रेस सुरु होणार आहेत. त्यामुळे पुणेकरांना महाराष्ट्रातील तसेच इतर राज्यातील विविध शहर गाठणे काही तासांतच गाठणे शक्य होणार आहे आणि प्रवाशांच्या वेळेचीही बचत होणार आहे.

मुंबई, ठाणे, नवी मुंबईत नवी व्यवस्था, फास्टॅगमधून पार्किंग शुल्क; परिवहन मंत्र्यांच्या MMRDA ला सूचना

* पुणे-शेगांव वंदे भारत या मार्गावरील एक्स्प्रेसला दौंड, अहमदनगर (अहिल्यानगर), छत्रपती संभाजीनगर आणि जालना या स्थानकांवर थांबा असणार आहे.

* पुणे-सिकंदराबाद वंदे भारत या मार्गावर दौंड, सोलापूर, गुलबर्गा या तीन स्थानकांवर थांबा असणार आहे. या मार्गावर ट्रेन सुरु झाल्यानंतर प्रवासाचा दोन ते तीन तासांचा वेळ वाचणार आहे. तर ही ट्रेन महाराष्ट्र, कर्नाटक आणि तेलंगणा या तीन राज्यांमधून धावणार असल्याने पुणेकरांचा प्रवास आणखी सुकर होणार आहे.

* पुणे-बडोदा वंदे भारत या ट्रेनला लोणावळा, पनवेल, वापी आणि सूरत या चार स्थानकांवर थांबा असणार आहे. ही एक्स्प्रेस महाराष्ट्र आणि गुजरात या राज्यातून जाणार आहे.

* पुणे-बेळगाव वंदे भारत ही पुणे जंक्शन ते बेळगाव जंक्शन या दरम्यान धावेल. या मार्गावर सातारा, सांगली आणि मिरज या तीन स्थानकांवर थांबा मिळणार असल्याची माहिती आहे.

महाराष्ट्रातील मुख्य शहर असणाऱ्या पुण्यातून वंदे भारत सुरु झाल्यास प्रवाशांसाठी येणे जाणे सुलभ होणार आहे. तसेच रेल्वे वाहतुकीतही सुसुत्रता येण्यास मदत होणार आहे. तर प्रवाशांचा वेळही २ तासांनी कमी होऊ शकणार आहे. यासोबतच आगामी काळात भारतीय रेल्वेकडून पुणे आणि नागपूर दरम्यान वंदे भारत स्लीपर ट्रेन सुरु केली जाण्याची देखील शक्यता आहे.

## फडणवीस सरकारचे राज्यातील जनतेला वीज बिलातून मोठे गिफ्ट

**अक्षराज : संजय पंडित**

**दि.१७, मुंबई :** एकीकडे महावितरणने वीज दर बिलात वाढ केल्याची ओरड होत असतानाच राज्य सरकारने पावसाळी अधिवेशात मोठी घोषणा केली. त्यामुळे राज्यातील जनतेला मोठा दिलासा मिळाला आहे. वीज दर कपातीचा मोठा निर्णय देवेंद्र फडणवीस सरकारने घेतला आहे. महायुती सरकारने जनतेला मोठे गिफ्ट दिले.१०० युनिट वापर असणाऱ्या ग्राहकांना याचा फायदा होईल. पुढील कित्येक वर्षे आता वीज दरात वाढ होणार नाही.

१०० युनिटच्या आतील वीज ग्राहकांना २६ टक्के शुल्क कपातीचा निर्णय घेतला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पावसाळी अधिवेशनात बुधवारी याविषयीची मोठा घोषणा केली आहे. मुख्यमंत्र्यांनी काँग्रेस नेते सतेज पाटील यांच्या प्रश्नाचे उत्तर देताना याविषयीची माहिती दिली. ग्राहकांची सुनावणी न घेता काही निर्णय का घेण्यात येत





आहे, असा आमदार पाटील यांचा सूर होता. त्याला मुख्यमंत्री फडणवीस यांनी उत्तर दिले. एमआरसीने चुकीचे आदेश दिल्याचे आणि त्यात दुरुस्तीची संधी असल्याचे म्हणणे सतेज पाटील यांनी सभागृहात मांडले.

राज्यातील ७० टक्के ग्राहकांचा वीज वापर हा १०० युनिटपेक्षा कमी असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले. त्यामुळे या ७० टक्के ग्राहकांना २६ टक्क्यांचे टेरिफ रिडक्शन, शुल्क कपात लागू असल्याची माहिती फडणवीस यांनी दिली. त्याच्या पुढील कुठल्याच श्रेणीत वाढ नाही. वीज ग्राहकांच्या सर्व श्रेणीत शुल्क कपात केल्याचे मुख्यमंत्री म्हणाले. वीज बिल आकारण्यातील त्रुटीवर मुख्यमंत्र्यांनी बोट ठेवले.९० हजार कोटींची आकडेमोड दुहेरी होत असल्याचे सरकारने लक्षात आणून दिले. एकीकडे घरगुती ग्राहकांना वीज सवलतीचा फायदा नाही तर दुसरीकडे जालन्यातील एका स्टील कंपनीला २०० कोटींचा फायदा सवलतीतून मिळत असल्याकडे मुख्यमंत्र्यांनी लक्ष वेधले. त्यानंतर MERC ने प्रकरण दाखल करून घेतले. नंतर त्रुटीत दुरुस्ती करण्यात आली. राज्यातील सर्व फीडरवर स्मार्ट मीटर बसले आहेत. त्यामुळे या वर्षाच्या अखेरीस कृषी वीज पुरवठ्यात नेमका कुठे किती तोटा होत आहे, याची आकडेवारी समोर येईल अशी माहिती त्यांनी दिली.

दरम्यान महावितरणचे राज्यात एकूण २ कोटी ८० लाख ग्राहक आहेत. यामध्ये ठाणे, मुलुंड, भांडूप, नवी मुंबईसह उर्वरीत महाराष्ट्राचा समावेश आहे. उद्योगांना प्रोत्साहन देण्यासाठी औद्योगिक ग्राहकांना वीज सवलत देण्यात येते. शेतकऱ्यांना सवलत देण्यात येते. आता शेतकऱ्यांसाठी सोलर ऊर्जेचा पर्याय समोर आल्याने त्यांचा वीज वापराचा बोजा कमी होईल. तर त्यांना अचानक वीज गेली तरी पिकांना पाणी देण्यासाठी ताटकाळत थांबावे लागणार नाही. राज्यातील अनेक घरांवर सुद्धा सौर ऊर्जा प्रकल्पातंर्गत सोलर पॅनल बसवण्याचे प्रमाण वाढले आहे.

## संपादकीय




### सुपरस्टार राजेश खन्ना

हिंदी चित्रपट सृष्टीतील पहिले सुपरस्टार म्हणून ओळखले जाणारे जेष्ठ अभिनेते राजेश खन्ना यांची आज तेरावी पुण्यतिथी. राजेश खन्ना यांचा जन्म २९ डिसेंबर १९४२ रोजी पंजाबमधील अमृतसर येथे झाला. राजेश खन्ना यांचे मूळ नाव जतीन खन्ना असे होते. त्यांच्या आईचे नाव चंद्राणी खन्ना तर वडिलांचे नाव लाला हिराणी असे होते. त्यांचे वडील शाळेत मुख्याध्यापक होते. त्यांच्या एका जवळच्या नातेवाईकांना मुलबाळ नव्हते म्हणून त्यांच्या आई वडिलांनी त्यांना त्या नातेवाईकांकडे दत्तक दिले. त्यांच्या नवीन आईचे नाव लीलावती खन्ना तर वडिलांचे नाव चुनीलाल खन्ना असे होते. चुनीलाल खन्ना रेल्वे कंत्राटदार होते. ते मुंबईत राहत होते. राजेश खन्ना हे सेंट सबिस्टाईन गॉन हायस्कूल येथे शिकत असताना त्यांची रवी कपूर यांच्याशी ओळख झाली. रवी कपूर म्हणजेच हिंदी चित्रपट सृष्टीतील प्रसिद्ध अभिनेते जितेंद्र. राजेश खन्ना व जितेंद्र यांनी कॉलेज जीवनात अनेक नाटकात एकत्र काम केले. नंतर उच्च शिक्षण घेण्यासाठी राजेश खन्ना हे पुण्यात आले. पुण्यात दोन वर्ष शिक्षण घेतल्यावर ते पुन्हा मुंबईला परतले. मुंबईत काही दिग्दर्शकांनी टॅलेंट हंट स्पर्धा आयोजित केली. राजेश खन्ना यांच्या काकांनी त्यांचे नाव या स्पर्धे करिता नोंदवले. ते नोंदवताना त्यांनी त्यांचे नाव जतीन खन्ना ऐवजी राजेश खन्ना म्हणून नोंदवले पुढे याच नावाने ते ओळखले जाऊ लागले. या स्पर्धेत त्यांनी पहिल्या क्रमांकाचे पारितोषिक मिळवले त्यांच्या अभिनयाने त्याकाळातील दिग्गज दिग्दर्शक प्रभावित झाले. १९६६ साली चेतन आनंद यांनी त्यांना आखरी खत या चित्रपटात संधी दिली हाच त्यांचा पहिला चित्रपट. हा चित्रपट ऑस्करला गेला होता. पहिल्याच चित्रपटातील त्यांच्या अभिनयाने चित्रपट रसिक तसेच जाणकार प्रभावित झाले त्यामुळे त्यांना अनेक चित्रपट मिळाले. त्याकाळातील यशस्वी दिग्दर्शक असणारे शक्ती सामंत यांनी त्यांना आराधना या चित्रपटात नायकाची भूमिका दिली. या चित्रपटात शर्मिला टागोर या त्यांच्या नायिका होत्या. चित्रपट सुपरहिट झाला. या चित्रपटातील सर्व गाणी लोकप्रिय झाली. या चित्रपटा नंतरच राजेश खन्ना सुपरस्टार म्हणून ओळखले जाऊ लागले. राजेश खन्ना यांची अदाकारी, संवाद फेकीची लकब यावर तरुणाई फिदा झाली. विशेषतः कॉलेज मधील मुली त्यांच्यावर जीव ओवाळून टाकू लागल्या. त्यांचे चाहते त्यांच्या गाडीचे चुंबन घ्यायचे. मुली त्यांच्या गाडीची धूळ आपल्या भांगेत भरत. बऱ्याचश्या मुलींनी त्यांच्या फोटोशी लग्न केले होते. त्यांना चाहत्यांचे जितके प्रेम लाभले तितके प्रेम कोणत्याच कलाकाराला लाभले नाही. राजेश खन्ना यांचे सलग १५ चित्रपट सुपरहिट झाले हा एक विक्रम आहे. तो अजूनही कोणत्या अभिनेत्याला तोडता आला नाही. शर्मिला टागोर, मुमताज, अशा पारेख, तनुजा यांच्याशी त्यांची चांगली केमिस्ट्री जमली. सत्तरच्या दशकात राजेश खन्ना सुपरस्टार पदावर आरूढ झाले होते. चालण्या बोलण्याची विशिष्ट ढब, मानेला खास झटका देत, हातवारे करत नाचण्याची अनोखी शैली, जबरदस्त संवाद फेक आणि ओठावर रुंजी घालतील अशी गाणी यामुळे राजेश खन्ना हे अफलातून रसायन बनून गेले. त्याकाळात सर्वाधिक मानधन घेणारे राजेश खन्ना यांची प्रेम प्रकरणेही गाजली पण १९७३ साली त्यांनी आपल्या पेक्षा कितीतरी लहान वयाच्या डिंपल कपाडिया यांच्याशी विवाह केला. १९९२ साली काँग्रेसच्या वतीने त्यांनी दिल्ली मतदार संघातून लोकसभेची पोटनिवडणुक लढवली आणि ते खासदार म्हणून निवडून आले. १८ जुलै २०१२ रोजी राजेश खन्ना यांनी चाहत्यांना अलविदा म्हणत जगाचा निरोप घेतला आणि बॉलिवूडचा पहिला सुपरस्टार काळाच्या पडद्याआड गेला.

**बाबूमोशाय....... बाबू मोशाय जिंदगी और मौत उपरवाले के हात है जहाँपणा...जिसे ना तो आप बदल सकते है ना मै.... हम सब तो रंगमंच की कटपुतलीया है, जीसकी डोर उपरवालेकी उंगलीओमे बंधी है....कब कोण कैसे उठेगा कोई बता नहीं सकता..... आनंद कभी मरते नहीं वह हमेशा याद रहते है....** we all miss you.....

**राजेश खन्ना यांना विनम्र अभिवादन!**

# दलित समाजाचा मुकुटमणी-साहित्यसम्राट अण्णा भाऊ साठे



दीड दिवस शाळेत जाणारा अवलिया साहित्यसम्राट झाला.साहित्य क्षेत्रातील सम्राट होणं तेवढं सोपं नाही.अहो! दीड दिवस तर शाळेची ओढ लागण्यातच निघून जातात.मात्र या साहित्य सम्राटाने केवळ दीड दिवस शाळेत ठेवलेल्या पावलाने,वीस वर्ष अगोदर शाळेच्याच अभ्यासक्रमात फकीरा कादंबरीच्या लिखाणातील स्मशानातील सोनं या पाठाच्या रूपाने मुलांना,उच्चशिक्षितांना व साहित्यिकांसमोर आदर्श ठेवला.अशा या साहित्य सम्राटाचा जन्म १ ऑगस्ट १९२० रोजी भाऊराव साठे व माय वालुबाई साठे यांच्या पोटी झाला. सांगली जिल्ह्यात वाळवा तालुक्यातील वाटेगाव त्यांचे मूळ गाव.मात्र देशभरच नाही तर विदेशाहीतही या साहित्यसम्राटाचा विचारांची क्रांती पसरली. जन्म दलित कुटुंबात झाला मात्र,विचारांची प्रगल्भता उच्च कोटीची होती.तत्कालीन जातीय भेदामुळे दीड दिवसात शाळा सोडून दिली. शाळा सोडून दिली म्हणून काय झालं? मात्र शाळेविषयी ओढ कुठे कमी झाली?शाळेतील वर्गात काय आणि वर्गाबाहेर काय, ज्ञान तर मिळवायचं..! असं म्हणून तुटपुंज्या अक्षर ओळखीतून साहित्य सम्राटाने रोड-रस्त्यावरील दुकानांच्या,दवाखान्याच्या,बसच्या पाट्या वाचल्या.या अक्षरांना मित्र केलं. त्यांच्यावर भरभरून माया केली. प्रेम केलं. शब्दांचा संग्रह करून माय मराठीच्या मायेचा पदर धरला.अन हो! एवढेच नाही तर, माय मराठीनेही लेकरू अण्णा भाऊंवर भरभरून माया केली.ओठांवर शब्द नाचू लागले आणि लेखनाच्या रूपाने कागदावर उमटू लागले.

अण्णाभाऊंच्या वैयक्तिक आयुष्याकडे बघितल्यास, दलित कुटुंबात त्यांचा जन्म झाल्यामुळे, सामाजिक दृष्टिकोनातून भेदभावाची वागणुक मिळाली.अठरा विश्व दारिद्र्य म्हणून पोटापाण्यासाठी कष्टाचं जिणं वाट्याला आलं. पोटा-पाण्यासाठी गावाकडून शहराकडे यावं लागलं.मात्र समाजातील आपल्यासारख्याच असंघटित, अकुशल कामगार,मजुरांचे दुःख त्यांना पहावेना. गरिबी,अज्ञानपणामुळे शिक्षित व उच्चवार्णियांकडून होणारी पिळवणूक त्यांना स्वस्थ बसू देईना. त्याच काळात कम्युनिस्ट विचारसरणीचे कॉम्रेड श्रीपाद अमृत डांगे डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचे वारे वाहत होते. त्यांच्या विचारांचा त्यांच्यावर प्रभाव झाला.मुळात अंगी लेखनाची आवड म्हणून,स्वतः गीत,पोवाडा लिखाण करून १९४४ मध्ये दत्ता गव्हाणकर व अमर शेख या दिग्गज शाहिंसोबत त्यांनी लालबावटा कालपथक उभारले.वय वर्ष चोवीस त्यामुळे अंगी धाडस,साहसी वृत्ती अन्याय विरुद्ध पेटून उठले.गोरगरीब लोकांच्या व्यथा समजून पोवडा,गीत,शायरी यातून व्यक्त झाले वलोकशाहीरझाले.यातून त्यांनी राजकारणात पाय रोवला.शासनाच्या गोरगरीब,अस्पृश्य व कामगार वर्गांवर होणाऱ्या जुलमी निर्णयाला आव्हान दिले. स्वातंत्र्य अगोदरचा काळ अण्णाभाऊंनी डोळ्याने बघितला.तेव्हातर परकीय इंग्रज शासन होते.अन्यायाविरुद्ध कामगारांवर होणाऱ्या अन्यायाचा प्रतिकार त्यांनी केलाच. मात्र,आशेचे किरण म्हणून भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर जातीभेदाचे व दुःखी,कष्टी,कामगारां वर होणारे अन्याय थांबतील,अशी अपेक्षा होती. मात्र तसे त्यांना निदर्शनास आले नाही म्हणून,१६ ऑगस्ट १९४७ रोजी मुंबईला वीस हजार बांधवांसह मोर्चा काढला.त्यांच्या मते,ये आजादी झुठी है,देश की जनता भुकी हैअशी अवस्था अजूनही कायम आहे. व या विचारांना त्यांनी घोषणेत रूपांतर केले अन जोरदार घोषणाबाजीतून मुंबई हादरवली.कामगार एकवटला.जागी झाला. स्वतःच्या अस्तित्वाची त्यांना जाणीव होऊ लागली.

साहित्यसम्राटांच्या या राजकारणी घडामोडीसह लिखाण सातत्याने चालू होते.डोळ्यांनी दिसलेले अन्यायाचे चित्र ते लेखनातून प्रकट करत होते.दलित कामगारांच्या जीवनावर कथा लिहत होते.स्व-अनुभव,सहन केलेले सामाजिक विषमतेचे चटके त्यांनी कथा व कादंबरीतून व्यक्त केले. त्यांच्या नावे एकूण पस्तीस कादंबऱ्या,पंधरा लघुकथा, बारा पटकथा, मराठी पोवाडा शैलीतील दहा गाणी त्याचबरोबर रशियातील प्रवास वर्णन पर लिखाण त्यासह नाटक, लावण्या आहेत.या समस्त लिखाणातील फकीरा कादंबरी ला १९६१ मध्ये राज्य सरकारच्या उत्कृष्ट कादंबरीचा पुरस्कार मिळाला आहे. अण्णाभाऊ साठेंचे लिखाण हे गिरणी कामगार, गोरगरीब लोकांचे लोकजीवन यांच्या भोवती फिरणारे आहे.त्यांच्या कष्टकरी जीवनाच्या व्यथा त्यांनी मांडल्या म्हणून,ज्येष्ठ साहित्यिक वि स खांडेकर त्यांच्या लिखाणाविषयी म्हणतात, अण्णा भाऊ साठे यांच्या गोष्टीत विनोद नाही असं नाही,मात्र प्रकृतीधर्म गंभीर लेखकाचा आहे.ज्यानं फार भोगला आहे.सात पडद्यातून नव्हे तर समोरासमोर जीवनातल्या क्रूर सत्याचे दर्शन ज्याला घडलं आहे,अशा पोट-तिडकिने लिहिणाऱ्या साहित्यिकाचा आत्मा त्यांना लाभला आहे. म्हणून सहाजिकच त्यांच्या गोष्टी मोठ्या वैशिष्ट्यपूर्ण असतात.म्हणून तत्कालीन सर्व बड्या कथाकारांपेक्षा ते निराळे आहेत.जीवनात आग ओकणाऱ्या हरतऱ्हेच्या गोष्टींचा अनुभव त्यांच्या गाठी आहे. त्यांच्या मनात एक प्रकारचा पीळ आहे.ते अन्यायाविरुद्ध बंड उभारणार्या वृत्तीचे पूजक आहे.असं त्यांच्याविषयी गौरवशाली विधान खांडेकर करतात.मूळ हेच की,अन्यायाचे चटके त्यांनी स्वतः सहन केले होते. इसवी सन १९५८ मध्ये अर्थात महाराष्ट्र राज्य निर्मितीच्या अगोदर मुंबई येथे आयोजित केलेल्या, पहिल्या दलित साहित्य संमेलनात उद्घाटनपर भाषणात ते बोलले,पृथ्वी ही शेषनागाच्या मस्तकावर तरलेली नसून दलित व कामगार लोकांच्या तळहातावर तरलेली आहे यातून अण्णा भाऊ साठे यांचे जगाच्या पाठीवरील समस्त दलित,शोषित कामगार या वर्गांचे महत्त्व स्पष्ट होते.

अशा या तांत्रिकदृष्ट्या अशिक्षित म्हणणाऱ्या परंतु उच्च शिक्षण तज्ञानाही लाजवेल अशा साहित्याच्या सम्राटाच्या लेखनावर आधारित सात चित्रपट निर्मिती झाली आहे.त्यांच्या जीवनावर आधारित २५ हून अधिक पुस्तके लिहिले आहेत. भारतीय डाक विभाग विभागाने टपाल तिकीट साकारले आहे. पुतळे देशातच नव्ह तर विदेशातही उभारले आहेत.अशा या महान विभूतीने वयाच्या अठ्ठे चाळीसव्या व्या वर्षी अर्थात १८ जुलै,१९६९ रोजी देह ठेवला.असे हे लोकशाहीर,साहित्यसम्राट अण्णा भाऊ साठे समस्त दलित समाजासाठी गर्वाने व अभिमानाने मिरवणाऱ्या शिरावरील मुकुटमणी ठरले.त्यांच्या स्मृतिदिना निमित्त विनम्र अभिवादन...!

**श्री.विनोद शेनफड जाधव**
**मासरूळ जि बुलडाणा**
**मो.नं. ९७६३२८२०७७**

## महाराष्ट्र वकील संरक्षण कायद्यास मंजुरी देण्याची आ.आवताडे यांची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

**अक्षराज : विकास सरवळे**



**दि.१७, पंढरपूर :** महाराष्ट्र विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनादरम्यान विधानभवनात उपस्थित असताना, राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे राज्यातील वकील बांधवांच्या विविध समस्या मांडत महाराष्ट्र वकील संरक्षण कायद्यास मंजुरी देण्याची मागणी निवेदनाद्वारे केली. महाराष्ट्रात सुमारे २ लाख वकील बांधव व भगिनी बार असोसिएशन कौन्सिलच्या माध्यमातून कार्यरत आहेत. पक्षकार व समाजकंटकांकडून त्यांना सातत्याने मारहाण, जीवे मारण्याच्या धमक्या दिल्या जातात. तसेच, त्यांच्याकडून खंडणीची मागणी केली जाते. या मागण्या पूर्ण न झाल्यास त्यांच्यावर सातत्याने जीवघेणे हल्ले होत असतात. अशा गुन्हेगारी प्रवृत्तीच्या लोकांना आळा घालण्याची गरज आहे. देशातील अनेक राज्यांमध्ये वकील संरक्षण कायदा पारित करण्यात आला असून या कायद्याच्या माध्यमातून वकिलांना संरक्षण देण्यात आले आहे. त्याच पद्धतीने, महाराष्ट्र राज्य व गोवा राज्यात वकील संरक्षण कायदा मंजूर करण्याकरिता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे निवेदन सादर केले.

## ओंकार मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल येथे रविवारी मोफत तपासणी, शस्त्रक्रिया शिबिर



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१७, पारनेर (अहिल्यानगर) :** पारनेर शहरातील ओंकार मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल येथे गरीब आणि गरजू रुग्णांसाठी रविवार, दिनांक २० जुलै रोजी सकाळी ९ वाजता मोफत तपासणी आणि शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरात विविध आजारांवर मोफत शस्त्रक्रिया केल्या जाणार असून, रुग्णांना तज्ञ डॉक्टरांकडून उपचार मिळणार आहेत.

यामध्ये कान, नाक, घसा संबंधित आजार, टॉन्सिल, नाकाचे हाड वाढणे, नाकाचे हाड फ्रॅक्चर, तसेच कान-नाक-घशाचे विविध आजार, मूळव्याध, भगंदर, गुदद्वाराचे आजार, पित्ताशयाचे आजार, वेरिकोन व्हेन्स, आणि अंगावरील गाठी अशा विवीध आजारांवरील मोफत तपासणी केली जाणार आहे. या तपासणीसाठी डॉ.विवेक चौधरी (MS, ENT), डॉ.केशरवाणी (MS, General Surgery) हे तज्ञ डॉक्टर्स उपस्थित राहणार आहेत. या शिबिराचा लाभ घेण्यासाठी रुग्णांनी रविवार, दिनांक २० जुलै २०२५ रोजी सकाळी ९ वाजता उपस्थित राहावे आणि गरजू रुग्णांनी या संधीचा अवश्य लाभ घ्यावा असे आवाहन ओंकार मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलचे डॉ.श्रीकांत पठारे आणि डॉ.पद्मजा पठारे यांनी केले आहे.

## फेरीवाला मुक्त दिवा शहर करण्यासाठी भाजपचा दिवा चौकामध्ये रास्ता रोको आंदोलन

**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.१७, दिवा (ठाणे) :** दिवा सर्कल चौकामध्ये भारतीय जनता पार्टीकडून दिनांक १७ जुलै २०२५ रोजी सकाळी ११:३० वाजता रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. या आंदोलनाला दिवा शहरातील रिक्षा संघटना, आर.पी.आय.ए पक्षाने पाठिंबा दिला.दिवा प्रभाग समितीचे सहाय्यक आयुक्त यांची बदली करा अशा घोषणा सुद्धा देण्यात आल्या.फेरीवाल्यांची वसुली कोण करतो त्याची वकिली कोण करतो, ५० रु.दे दो रस्ते पे बैठौ..., मनपा अधिकारी सुस्त, फेरीवाले मगर मस्त, वसुलीबाज खाऊन, फस्त आणि दाव्यातील जनता मात्र त्रस्त, हाय हाय/ हाय हाय वसुली बाज हाय हाय, सहाय्यक आयुक्त यांची बदली करा बदली करा असे फलक पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांच्या हातात दिसले. आंदोलन करणाऱ्या भाजपा पदाधिकाऱ्यांना पोलीस प्रशासनाने ताब्यात घेतले. या आंदोलनाची दखल प्रशासनाने घेतली




नाही तर अजून तीव्र आंदोलन छेडले जाईल असा इशारा भाजपा कडून देण्यात आला आहे.

या अगोदर ९ जुलै २०२५ रोजी भाजपा कडून दिवा प्रभाग समिती सहाय्यक आयुक्तांना निवेदन देण्यात आले होते. त्यावेळी सहाय्यक आयुक्त यांनी ५ ते ७ दिवसाची मुदत मागितली होती. त्यामुळे भाजपाने त्यांच्या विनंतीला मान दिले होते. त्यानंतर त्यांनी एक दिवस थातूरमातूर कारवाई दिखाव पुरती केली. दिवा शहर फेरीवाला मुक्त करण्याचे त्यांनी आश्वासन दिले होते पण त्यांनी तसे केले नाही. दिनांक १७ जुलै २०२५ ला भाजपकडून रस्ता आंदोलन छेडल्या जाईल असा इशारा सुद्धा भाजपकडून देण्यात आला होता. म्हणून आज भाजपकडून रास्ता रोको आंदोलन करण्यात आले त्यामुळे दिवा सर्कल चौकामध्ये वाहतूक कोंडी जाम झाली होती.दिवा शहर हा फेरीवाला मुक्त झाला पाहिजे. घोषणा कार्यकर्त्यांनी दिल्या.

रेल्वे स्टेशन पासूनचे १५० मीटर अंतर फेरीवाला मुक्त ठेवण्याचा सुप्रीम कोर्टाचे ऑर्डर असताना सुद्धा फेरीवाले राजरोसपणे रस्त्यावर हातगाड्या लावून व्यवसाय करत आहेत. फेरीवाले रस्त्यावर व्यवसाय करत असल्यामुळे दिव्यातील नागरिकांचा वारंवार अपघात होत असतात. काही नागरिक जखमी सुद्धा झाले आहेत तर काही जणांचा मृत्यू ही झाला आहे. दिवसेंदिवस फेरीवाल्यांची दादागिरी वाढत चालली आहे. फेरीवाले नागरिकांवर हल्ले सुद्धा करत आहे. त्यामुळे दिव्यातील नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. म्हणूनच नागरिकांच्या सुरक्षेसाठी भारतीय जनता पार्टीने निष्क्रिय ठाणे महानगरपालिका प्रशासन विरुद्ध रास्ता रोको आंदोलन केला आहे. दिवा प्रभाग समिती सहाय्यक आयुक्त यांनी सुद्धा प्रतिक्रिया दिली आहे. लवकरच कारवाई केली जाईल आणि रेल्वे परिसरातील रस्ते हे मोकळे केले जातील.

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

## खासदार नरेश म्हस्के यांचा मध्य रेल्वे महाप्रबंधकांना जन आंदोलनाचा इशारा

**अक्षराज : तानाजी ताकतोडे**

**दि.१७, ठाणे :** लोकसभा मतदारसंघातील सर्व रेल्वे स्थानकांवर प्रवाशांसाठी मुलभूत सोयीसुविधा देण्यात मध्य रेल्वे प्रशासनाकडून दिरंगाई होत आहे. खासदार नरेश म्हस्के यांनी मध्य रेल्वेचे महाप्रबंधक धर्मवीर मीना यांची दिनांक १७ जुलै २०२५ रोजी भेट घेऊन बैठक घेत चांगलाच सज्जड दम देत लवकरात लवकर विकासकामे पूर्ण न केल्यास जनआंदोलन करण्याचा इशारा दिला आहे.आरएलडीएच्या माध्यमातून ठाणे रेल्वे स्थानकाचा पुनर्विकास लवकरात लवकर होणे अपेक्षित आहे. ठाणे स्थानकाच्या पुनर्विकासासाठी डीपीआर मास्टर प्लॅनच्या माध्यमातून ९५० कोटी रुपयांचा प्रस्ताव २६ मे २०२३ रोजी रेल्वे प्राधिकरणाने पाठविला आहे. मी निवडून आल्यापासून या विकासकामासाठी नियमित पाठपुरावा करत आहे. मात्र अद्याप पुनर्विकासाची प्रक्रिया सुरू झालेली नाही. मास्टर प्लॅन पाठवून सुद्धा २ वर्षांहून अधिक काळ लोटला तरी काम सुरु न झाल्याबद्दल खासदार नरेश म्हस्के यांनी बैठकीत नाराजी व्यक्त केली. ठाणे रेल्वे स्थानकातील मुंबईच्या (सीएसएमटी) दिशेने जाणाऱ्या फलाट क्रमांक १० वरुन मोठ्या संख्येने महिला वर्ग प्रवास करत असतात. फलाटावर छत नसल्याने पावसाळ्यात महिलांना गैरसोयीचा सामना करावा लागत असल्याची बाब महाप्रबंधक यांच्या निदर्शनास खासदार नरेश म्हस्के यांनी आणून देत लवकर



लवकर यावर मार्ग काढण्याची सूचना केली.

ठाणे ते मुंबई (सीएसएमटी) कडे जाणाऱ्या फलाटावर अजून एक पादचारी पूल बांधणे आवश्यक आहे. हा पादचारी पूल फलाट क्रमांक १ ते फलाट क्रमांक ७ आणि ८ नंबरला पूर्व आणि पश्चिम असा जोडला जाईल. ते काम तातडीने सुरु करावे. ठाणे रेल्वे स्थानकात फलाट क्रमांक ५ ते फलाट क्रमांक १० ला जोडणाऱ्या पादचारी पूलाच्या पुनर्बांधणीचे काम अपूर्ण असून ते तात्काळ मार्गी लावावे. वर्तकनगर येथील आरक्षण केंद्रात एक शौचालय (पुरुष/महिला) बांधावे. केंद्रात पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, आरक्षण केंद्राचे नूतनीकरण करावे. नव्याने वायरिंग, खिडक्या दुरुस्ती, रंगरंगोटी, बैठक व्यवस्था इत्यादी कामे त्वरित पूर्ण करुन नागरिकांना दिलासा द्यावा, अशी सूचना खासदार नरेश म्हस्के यांनी बैठकीत केली.

सिडको प्रशासनाने नवी मुंबईमधील रेल्वे स्थानकांची निर्मिती केली आहे, तर रेल्वे प्रवासी सेवा मध्य रेल्वे देत आहे. या दोन्ही प्राधिकरणांमध्ये समन्वयाचा अभाव असल्याने कित्येक वर्ष येथील रेल्वे स्थानकांची सुधारणाच झालेली नाही. स्थानकांतील दुर्दशेमुळे प्रवाशांना नाहक गैरसोयींना सामोरे जावे लागत आहे. या गंभीर प्रश्नाकडे आजवर कोणाचेच लक्ष गेले नव्हते ही दुर्दैवाची बाब खासदार नरेश म्हस्के यांच्या निदर्शनास आली. निवडून आल्यापासून खासदार नरेश म्हस्के यांनी सातत्याने यासाठी पाठपुरावा करत आहेत.

आजच्या बैठकीत रेल्वेचे महाप्रबंधक धर्मवीर मिना आणि सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल यांच्याशी दुरध्वनीद्वारे खासदार नरेश म्हस्के यांनी संभाषण करून देत चर्चा केली. येथील प्रवासी माझ्याशी सोयीसुविधा देण्यासाठी वारंवार संपर्क करत आहेत. मात्र दोन्ही प्राधिकरणात समन्वय नसल्याने प्रवासी त्रस्त आहेत. यावर मार्ग न निघाल्यास कायदा हातात घेऊन आंदोलनाचा इशारा खासदार नरेश म्हस्के यांनी दोन्ही अधिकाऱ्यांना दिला. यावर दोन्ही अधिकाऱ्यांनी या आठवड्यात संयुक्त बैठक घेऊन प्रवाशांचे प्रश्न सोडविण्याचे आश्वासन दिले.

मध्य रेल्वे, मुंबई विभागाने दिघा ते ठाणे स्थानका दरम्यानच्या ट्रकच्या अप-डाऊन लाईनवरील वर आणि खाली जाणाऱ्या जुळ्या (फक्त दुचाकी/तीन चाकी वाहनांसाठी) भुयारी मार्गासाठी प्रस्ताव पाठवला आहे. हे भुयारी मार्ग लवकरात लवकर होणे आवश्यक असून भुयारी मार्ग नसल्यामुळे नागरिकांना ट्रॅक ओलांडावा लागत असून अपघात होत असल्याची गंभीर बाब खासदार नरेश म्हस्के यांनी महाव्यवस्थापक यांच्या निदर्शनास आणून दिली.

दिघा रेल्वे स्थानकात छत, पंखे, दिवे आणि ध्वनिक्षेपकाची दुरुस्ती, रेल्वे स्टेशन बाहेर ब्लॉक बसविणे, तसेच दिघा, ऐरोली आणि कोपरखैरणे या स्थानकांवर एस्कलेटरची सुविधा, ऐरोली स्थानकावर आरक्षण खिडकी सुरू करणे, रबाळे पश्चिम कडील तिकीट खिडकी रात्री ११ वाजेपर्यंत सुरु ठेवणे, सानपाडा-जुईनगर रेल्वे पुलाचे काम पुन्हा सुरू करण्याची सूचना खासदार नरेश म्हस्के यांनी केली. वाशी ते बेलापूर, तुर्भे ते ऐरोली आणि बामनडोंगरी ते खारकोपर या सर्व रेल्वे स्थानकांवरील रेल्वे फलाट, रेल्वे कार्यालयांच्या आजूबाजूचा परिसराची सुधारणा करणे आवश्यक असल्याची बाब खासदार नरेश म्हस्के यांनी अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून दिली.

आजच्या बैठकीत अनेक प्रश्नांवर चर्चा झाली. चर्चेतून अनेक प्रश्न मार्गी लागल्याचे खासदार नरेश म्हस्के यांनी सांगितले. यांच्यासह डीजीएम के.के. मिश्रा, डीआरएस हरीश मीना ,एस .एस. गुप्ता आणि वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

## दिव्यांगांसाठी ठाणे महानगर पालिकेने घेतला महत्वपूर्ण निर्णय

**अक्षराज : संजय पंडित**

**दि.१७, ठाणे :** पिंपरी चिंचवड महापालिकेतील 'दिव्यांग भवन फाऊंडेशन' च्या धर्तीवर ठाणे महापालिकेत 'दिव्यांग फाऊंडेशन' ही स्वतंत्र कंपनी स्थापन करण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला असून या संबंधीच्या प्रस्तावास ठाणे महापालिकेच्या प्रशासकीय सभेने मान्यता दिल्याने कंपनी स्थापनेचा मार्ग मोकळा झाला आहे. ठाणे महापालिका क्षेत्रातील अपंगांना विविध सोयीसुविधा तसेच उपचार मिळावा. तसेच सामाजिक दायित्व, अनुदानाच्या माध्यमातून अपंगांच्या विकासाकरिता काम करणे, या उद्देशातून कंपनीची स्थापना करण्यात आली आहे.

ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील अपंग व्यक्तींना विविध प्रकारच्या सोयी सुविधा आणि उपचार उपलब्ध करून देण्यासाठी एक स्वतंत्र अस्तित्व असलेली संस्था निर्माण करण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला होता. यानुसार ठाणे महानगरपालिका, आनंद दिव्यांग कल्याण फाऊंडेशन किंवा ठाणे महानगरपालिका, आनंद दिव्यांग फाऊंडेशन या नावाने कंपनी स्थापन करण्यात येणार आहे. त्याची स्थापना कंपनी कायदा २०१३ च्या कलम ८ नुसार करून ना नफा ना तोटा या तत्त्वावर चालवली जाणार आहे. हि कंपनी धर्मादाय अथवा चॅरिटेबल सोसायटी या पद्धतीने सुद्धा कामकाज करेल, असे पालिकेने प्रस्तावात म्हटले आहे.

या संस्थेचे नियंत्रण हे कंपनीच्या संचालक मंडळाचे मार्फत होणार आहे. तर, त्यांना मदत करण्याकरिता कंपनी एक सल्लागार समितीची स्थापना करून त्याच्यामध्ये विविध विषयातील तज्ज्ञांना सभासदत्व दिले जाणार आहे. सल्लागार समिती ही कंपनीच्या संचालक मंडळाला त्यांचे अहवाल आणि त्यांच्या सूचना देऊ शकतात आणि त्यानुसार कंपनीचे संचालक मंडळ त्यावर योग्य तो निर्णय घेऊन या निर्णयांची अंमलबजावणी करून




परिणामकारकरीत्या घडवून आणू शकतात, असे पालिकेने प्रस्तावात म्हटले आहे.

ही एक स्वतंत्र अस्तित्व असलेली संस्था आहे. त्यामुळे तीच्या दैनंदिन कामकाजामध्ये महापालिकेचा हस्तक्षेप कमीत कमी होऊ शकतो. तसेच संस्था स्वतःच्या कार्यासंबंधी स्वतः निर्णय घेऊ शकत असल्यामुळे काही अनावश्यक हस्तक्षेप टाळता येऊ शकतात. ही संस्था वेगळे अस्तित्व असलेली संस्था असल्याकारणामुळे या संस्थेस आयकर कायद्यानुसार आयकरातून सूट मिळू शकते. ही संस्था महापालिकेच्या विद्यमाने स्थापन झालेली असल्याकारणाने तिला कंपन्यांचे सामाजिक दायित्व मिळवता येणे सोपे जाते. ही संस्था आपले स्वतः चे अंदाजपत्रक तयार करून त्यानुसार महापालिकेकडून योग्य ती रक्कम अनुदान स्वरूपात मिळवू शकते आणि त्यानुसार तिचे कामकाज चालू शकते.

संस्थेचे कामकाज स्वतंत्रपणे चालत असल्यामुळे ही संस्था अपंगांच्या विकासावरती पूर्ण लक्ष केंद्रित करून आपले कामकाज परिणामकारकरीत्या आणि योग्य त्या क्षमतेने करू शकते. या संस्थेच्या कामकाजामध्ये अपंगांसाठी कार्यरत असलेल्या संस्थांचा तसेच अपंग संघटनांचा तसेच अपंगांवर उपचार करणाऱ्या विविध व्यावसायिकांचा अंतर्भाव अतिशय परिणामकारकरीत्या घेता येतो आणि त्यामुळे दिव्यांगांना देण्यात येणाऱ्या सोयी सुविधांना प्राधान्य मिळू शकते. ही संस्था वेगवेगळ्या संस्थांसोबत करार करू शकते आणि त्यानुसार त्याचा फायदा दिव्यांग व्यक्तीपर्यंत पोहोचवू शकते. ही संस्था स्वतःचे संशोधन गृह तयार करून त्यामध्ये अपंगांसाठीचे वेगवेगळ्या संशोधित वस्तूचे उत्पादन करू शकते तसेच वेगवेगळ्या औषधांवरती संशोधन तसेच वेगवेगळ्या उपचारांवरतीचे संशोधन करू शकते. त्यासाठी एक वेगळे अंदाजपत्रक करून घेऊ शकते तसेच त्यावर योग्य ते नियंत्रण ठेवून त्यामधून समाजामध्ये वेगळे परिमाण घडवून आणण्याची क्षमता स्वतः मध्ये आणू शकते.

अपंगांसाठी लागणाऱ्या विविध योजना तसेच त्यांना देण्यात येणारे लाभाचे महानगरपालिकेच्या समाज विकास विभागाबरोबर सुसूत्रीकरण करून ते योग्य त्या व्यक्तीस पोहोचत आहेत याची खातरजमा करता येईल. ही संस्था अपंगांसाठी काम करणाऱ्या विविध तज्ज्ञ व्यक्तीबरोबर सामंजस्य करार करून त्यांना देण्याविषयीच्या उपचारांमध्ये भरीव गुणात्मक आणि संख्यात्मक वाढ करून समाजामध्ये दिव्यांगांना स्वतःचे पायावर उभे राहण्यासाठी प्रोत्साहित करू शकते, असे या कंपनी स्थापनेमागचा फायदा असल्याचे पालिकेने म्हटले आहे.

तसेच या कंपनीच्या संचालक मंडळात आठ सदस्य असणार आहेत. यात अध्यक्ष पदावर आयुक्त, उपाध्यक्ष पदावर अतिरिक्त आयुक्त-२, सदस्यांमध्ये समाज विकास विभागाचे उपायुक्त, समाज विकास अधिकारी, महापालिकेचे महापौर, महापालिकेचे उपमहापौर, महापालिकेचे स्थायी समिती सभापती, महापालिकेचे विरोधी पक्ष नेता यांचा समावेश असेल.

## पारनेर तालुक्यात पावसाने ओढ दिल्यामुळे पिके धोक्यात

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१७, पारनेर (अहिल्यानगर) :** महिनाभरापासून पाऊस गायब झाल्याने पिकांनी माना टाकण्यास सुरुवात केली आहे. महिनाभरात पीक वाढीसाठी अनुकूल वातावरणही निर्माण झाल्याने सध्या पाऊस न आल्यास त्या पिकांतून उत्पादनात कमालीची घट येण्याचा अंदाज कृषी विभागाने वर्तवला आहे. येत्या ५ - ६ दिवसांत पाऊस आल्यास कोरडवाहू हलक्या जमिनीतील पीक मोडावे लागण्याची शक्यता निर्माण झाल्याने शेतकऱ्यांना धास्ती पसरली आहे.



मागील वर्षी परिसरात सातत्याने अतिवृष्टी परिस्थितीमुळे खचलेल्या शेतकऱ्यांच्या जखमांवर या वर्षी दीर्घ पावसाच्या उसंतीने मीठ चोळल्या गेले आहे. मागील दोन वर्षात अतिवृष्टीमुळे खरीप तर बेमोसमी पावसामुळे रब्बी हंगामातील पिकांना जबर हादरे बसल्यामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक कणा मोडला आहे. टाकळी ढोकेश्वर सह तालुक्यातील अल्प अत्यल्प भूधारकांची संख्या सर्वाधिक असल्यामुळे आतापर्यंत या शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती पार ढवळून निघाली होती. यावर्षी पावसाने घेतलेल्या दीर्घ विश्रांतीमुळे बडे शेतकरीही हादरले असल्याचे चित्र परिसरात निर्माण झाले आहे.

### लागवडीचा खर्च ही निघणे मुश्किल

तालुक्यातील पठार भागातील शेतकऱ्यांनी लाखो रुपये खर्चून वाटाणा, पावटा,मुग आदी पिकांची लागवड केली आहे. यावेळी वाटाणा पिकातून अधिक प्रमाणात उत्पादन होईल, अशी अपेक्षा शेतकऱ्यांना होती. मात्र वाटाणा, मूग बाजरी आदी पिकांनी माना टाकू लागल्यामुळे त्यांना येत्या दोन दिवसात जर पावसाने हजेरी नाही लावली तर त्यांना संपूर्ण लागवड केलेल्या पिकाचे नुकसान होईल आणि त्यांच्या हाती लागवडीसाठी लागलेला खर्चही निघणे मुश्किल होणार आहे.

# थोडक्यात

## नवीन मीटर बसविणे बंद करा, वाढीव विजदर रद्द करा - नागरिकांचे कनिष्ठ अभियंताला निवेदन

**अक्षराज : दत्ता हमंद**



**दि.१७, कुंडलवाडी (नांदेड) :** कुंडलवाडी वीज वितरण कार्यालयाचे अभियंता सुरेश गटुवार यांची भेट घेऊन नवीन मीटर बसविणे बंद करा, वाढीव विजदर रद्द करा. अशा आशेचे निवेदन शहरातील नागरिकांच्या एका शिष्टमंडळाने येथील विद्युत वितरण कार्यालयाचे कनिष्ठ अभियंता सुरेश गटुवार यांना दिले. दिलेल्या निवेदनात असे नमुद करण्यात आले की, आपल्या कार्यालय मार्फत गेल्या ३ महिण्यापुर्वी शहरातील शतरंजीगल्ली, खुरेशीगल्ली, बागवान गल्ली, भोई गल्ली, कुभार गल्ली, नरागल्ली वंजारगल्ली अशा काही मोजक्या गल्लीत नवीन विद्युत मिटर बसविण्यात आले. या संदर्भात ग्राहकास कसल्याच प्रकारची पुर्व सुचना देण्यात आले नाही.या नवीन मिटरचे दर सामान्य नागरिकांना परवडणारे नाही. अव्वा की सव्वा लाईट बिल आकारण्यात येत आहे. या भागातील नागरिकांचे हातावर पोट आहे. अनेक नागरिकांना हजारो रूपये लाईट बिल आले आहे. घरात मानसे नसताना ही हजारो रूपये बिल येत आहे. यामुळे माणसाने परिवार सांभाळावे की हजारो रुपये लाईट बिल भरावे. हे लाईट बिल न परवडणारे आहे. तरी आम्हा सर्व नागरीकांच्या घरी नवीन मिटर बसविणे बंद करा, वाढीव विजदर रद्द करा जुनेच मिटर बसविण्यात यावे. अन्यथा लोकशाही मार्गाने जनआंदोलन करण्यात येईल. असा इशारा पण देण्यात आला आहे.

## भंडारकवठे लोकमंगल कारखाना परिसरात एक हजार झाडे लावण्याचा प्रारंभ

**अक्षराज : शिवाजी मुगळे**



**दि.१७, सोलापूर :** भंडारकवठे येथील लोकमंगल कारखाना चांगल्या पद्धतीने चालावा. शेतकरी व कामगारांना वेळेवर त्यांची रक्कम व पगार मिळावा. यासाठी आम्ही आर्थिक ताकद देऊ. तेव्हा कारखान्याची आणखी भरभराटी होण्यासाठी व्यवस्थापनाने कामाला लागावे. वृक्षारोपण करून हिरवळ वाढवावी, असे आवाहन बुलढाणा अर्बन को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीचे कार्यकारी संचालक शिरीष देशपांडे यांनी केले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी एक पेड माँ के नाम उपक्रमांतर्गत वृक्षारोपणाचे आवाहन केले आहे. त्यानुसार आज बुधवारी भंडारकवठे येथे लोकमंगल साखर कारखाना व बुलढाणा अर्बन को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी यांच्या संयुक्त विद्यमाने वृक्षारोपण करण्यात आले. कारखान्याने परिसरात एक हजार एक वृक्षारोपणाचा संकल्प केला आहे. त्याची सुरुवात म्हणून आज दोन एकर क्षेत्रावर आंब्याची रोपे लावण्यात आली. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी कारखान्याचे चेअरमन महेश देशमुख होते. यावेळी बुलढाणा बँकेच्या सरव्यवस्थापिका योगिनी पोकळे, सतीश देशमुख, मंद्रुपचे पीएसआय राजू डांगे, भंडारकवठेचे सरपंच भीमाशंकर बबलेश्वर, भाजपचे जिल्हा सरचिटणीस यतीन शहा यांची प्रमुख उपस्थित होती. कारखान्याचे चेअरमन महेश देशमुख म्हणाले, दिवसेंदिवस पर्यावरणाचा ऱ्हास होत आहे. त्याचा परिणाम पर्जन्यमानावर होत आहे. तेव्हा निसर्गाचा समतोल राखण्यासाठी वृक्षारोपण ही काळाची गरज आहे. ज्ञानदान व वृक्षारोपण ही अशी दोन कामे आहेत की त्याचा फायदा समाजाला होतो. तेव्हा कोल्हापूर प्रमाणे सोलापूर जिल्ह्यात हिरवळ वाढावी. यासाठी वृक्षारोपण करणे ही काळाची गरज आहे. सूत्रसंचालन कारखान्याचे सहाय्यक व्यवस्थापक दीपक नलावडे यांनी केले तर आभार शैशैल लोखंडे यांनी मानले.

## सेवा जेष्ठतेनुसार पदोन्नती द्या - आरोग्य सेविकांची जिल्हा परिषदेला मागणी

**अक्षराज : दिवाकर घेर**



**दि.१७, नागपूर :** जिल्हा परिषद अंतर्गत कार्यरत प्राथमिक आरोग्य केंद्रातील आरोग्य सेविकांनी सेवा पदोन्नती सन २०२४ च्या सेवाजेष्ठता यादीनुसारच मिळावी, अशी ठाम मागणी जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागाकडे केली आहे. शासनाच्या २० जून २०२१ च्या जीआरमध्ये सेवाजेष्ठतेनुसार पदोन्नती देण्याचे स्पष्ट निर्देश असूनही नागपूर जिल्हा परिषदेमध्ये या आदेशाला हरताळ फासला जात असल्याची चर्चा होत आहे. आरोग्य सेविकांच्या म्हणण्यानुसार, पदोन्नती प्रक्रियेमध्ये सरळसेवा परीक्षेतील गुणांच्या आधारे निवड केली जात असून सेवाजेष्ठतेचा विचारच केला जात नाही. विशेष म्हणजे ही यादी फक्त २००८ बॅचसाठी तयार करण्यात आली आहे. त्याआधी आणि नंतरच्या बॅचच्या सेविकांचा पूर्णपणे बळी गेला आहे, असा गंभीर आरोप करण्यात आला आहे.

पदोन्नतीसाठी तयार करण्यात आलेली सेवा जेष्ठता यादी ही नियमबाह्य पद्धतीने तयार केली असून, त्यामागे विशिष्ट हेतू असल्याचा संशय आहे, असे आरोग्य सेविकांनी स्पष्ट केले. शासन निर्णयात असा कुठलाही बदल अपेक्षित नाही, तरीदेखील जिल्हा परिषदेमध्ये मनमानी सुरू आहे, हे दुर्दैवी असल्याचे त्यांनी सांगितले.

या अन्यायाविरोधात आरोग्य सेविकांनी तीव्र संताप व्यक्त केला असून, लवकरात लवकर सेवा जेष्ठतेनुसार पदोन्नती न दिल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा जिल्हा परिषद आरोग्य संघटनेच्या अध्यक्षा अशा पाटील यांनी दिला आहे.

- शासनाच्या जीआरनुसार पदोन्नती प्रक्रियेत सेवाजेष्ठतेचे विचार आवश्यक
- २००८ बॅचपुरतीच पदोन्नती यादी, इतर बॅच वगळल्या
- आरोग्य सेविकांवर अन्यायाचा आरोप
- त्वरित दखल न घेतल्यास आंदोलनाचा इशारा